# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

प्रभात पुणे, मंगळवार, दि. २६ जानेवारी २०१६
गुड मॉर्निंग
पुणे जिल्हा 03

# प्रलोभनाला बळी न पडता मतदान करू

## राजगुरूनगरात राष्ट्रीय मतदारदिनानिमित्त घेतली शपथ : विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली

राजगुरुनगर, दि.२५ (प्रतिनिधी) - प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करावे, देशाच्या लोकशाही परंपरेचे जतन करू आणि मुक्त नि:पक्षपाती वातावरणात निवडणुका पार पाडू, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करू अशी, शपथ राजगुरुनगरमध्ये आज (सोमवारी) मतदारांनी घेतली.



राजगुरूनगर : तहसीलदार कार्यालयात मतदारदिनानिमित्ताने महाविद्यालयीन युवकांना व मतदारांना तहसीलदार सुनील जोशी यांनी शपथ दिली. याप्रसंगी उपस्थित इतर मान्यवर.

**लोकशाही प्रगल्भ होण्यात मतदारांचा मोठा वाटा असून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि नव्या मतदारांना आपल्या कर्तव्याची जाणीव निर्माण व्हावी या हेतूने मतदारदिनाचे आयोजन करण्यात येत आहे. मतदान हे श्रेष्ठ दान आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा हक्क सर्वसामान्य माणसाला प्रदान करण्यात आला आहे. त्याचा सुयोग्य वापर करण्यासाठी जनजागृती केली जात आहे.**

**– सुनील जोशी,** तहसीलदार

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्ताने राजगुरुनगर येथे मतदारांना मतदान कार्डाचे वाटप करण्यात आले. यावेळी येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील २०० राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅली काढली. त्यावेळी तहसीलदार कार्यालयात विद्यार्थ्यांना आणि मतदारांना शपथ देण्यात आली.

यानिमित्ताने खेड तहसीलदार कार्यालयात सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, मतदार, आणि महाविद्यालायीन विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी प्रांताधिकारी हिम्मतराव खराडे, तहसीलदार सुनील जोशी, नायब तहसीलदार माणिकराजे निंबाळकर, लतादेवी वाजे, राजेंद्र जाधव, जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस भास्कर तुळवे, तालुका अध्यक्ष विजय डोळस, मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष समीर थिगळे, तालुका उपाध्यक्ष नितीन ताठे, मंगेश सावंत, शहराध्यक्ष सोपान डुंबरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण चांभारे, भाजपचे तालुकाध्यक्ष दिलीप वाळके, संघटक कैलास टाकळकर, सुभाष गाढवे, शिवसेनेचे शेतकरी सेना प्रमुख एळ. बी. तनपुरे, ग्राहक कक्ष तालुका प्रमुख महेंद्र घोलप, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, मच्छिंद्र मुळूक, प्रा महेश घाडगे, प्रा. धनंजय वाघ, अरुण सोमवंशी, मंडल अधिकारी एस. व्ही. शिर्के, गणेश डुबे, निलेश घोडके, स्मिता कुलकर्णी, महेश खंडागळे यांच्यासह मोठ्या संख्येने मतदार, महाविद्यालयातील विद्यार्थी नागरिक राजकीय पक्षाचे पदाधिकारी, संस्था संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मतदार दिनानिमित्ताने आयोजित केलेल्या रॅलीचे उद्घाटन तहसीलदार सुनील जोशी, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ एस.बी.पाटील यांच्या हस्ते झाले. हुतात्मा राजगुरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या २०० राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅली काढली. राजगुरुनगर शहर, बाजारपेठेतून खेड तहसीलदार कार्यालयापर्यंत या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तहसीलदार कार्यालयात खेड विभागाचे प्रांत अधिकारी हिम्मतराव खराडे, तहसीलदार सुनील जोशी यांनी या जनजागृती रॅलीचे स्वागत करून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शपथ दिली. दिली. सूत्रसंचालन नायब तहसीलदार माणिकराजे निंबाळकर यांनी केले. तर निवडणूक नायब तहसीलदार लतादेवी वाजे यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख